# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.03.2026** **वारःशुक्रवार**

1. 2025-26 साठी राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल विधानसभेत सादर
2. वर्तमान आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर 7 पूर्णांक 9 दशांश टक्के राहण्याचा अंदाज
3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार
4. राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून सात अर्ज दाखल; बिनविरोध निवडीच्या औपचारिक घोषणेची प्रतीक्षा आणि
5. टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडवर 7 धावांनी मात करत भारताची अंतिम फेरीत धडक; 8 मार्चला न्यूझीलंडशी अंतिम लढत

**आर्थिक पाहणी अहवाल**

राज्याची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून वर्तमान आर्थिक वर्षात ती 7 पूर्णांक 9 टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2025-26 या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातली संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्रात 3 पूर्णांक 4 दशांश टक्के, उद्योग क्षेत्रात 5 पूर्णांक 7 दशांश टक्के आणि सेवा क्षेत्रात 9 टक्के वाढीचा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.

हा अहवाल काल विधानसभेत अर्थ आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी तर विधानपरिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपीत महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक वाटा असून, देशातील थेट परकीय गुंतवणुकीत 31 टक्के वाट्यासह राज्य अग्रस्थानी असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. राज्यात रस्ते, मेट्रो, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात झालेल्या गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधांचा विकास वेगानं होत असल्याचं अहवालात नमूद केलं आहे तर जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दरातल्या सुधारणांमुळे किमतींवर सकारात्मक परिणाम झाल्याचंही अधोरेखित करण्यात आलं आहे.देशातल्या स्टार्टअप्सच्या संख्येतही राज्याचा देशात सर्वाधिक 17 टक्के हिस्सा आहे. नवीकरणीय ऊर्जेची क्षमता वाढत असून राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्याचं दरडोई उत्पन्न 3 लाख 47 हजार 903 रुपये असल्याचं अहवालात म्हटलं आहे. दरम्यान, 2026-27 या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दुपारी दोन वाजता सभागृहात सादर करणार आहेत.

**विधिमंडळ**

मुंबईत वायू प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येत असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी काल विधानसभेत तारांकित प्रश्नात दिली. मुंबईतल्या वाढत्या वायू प्रदूषणाच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन गंभीर असून, बांधकाम प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

नागपुरमधल्या  कारखाना स्फोट प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करावा आणि सदर कारखाना बंद करावा अशी मागणी विजय वडेट्टीवार, नाना पटोले, संजय मेश्राम यांनी काल विधानसभेत केली. कारखान्याचं ऑडिट होऊनही इथं स्फोट होत असेल तर निरीक्षकावरही गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी विरोधी सदस्यांनी केली. चौकशी अहवाल आल्यानंतर गुन्हे

दाखल करण्याचा विचार केला जाईल असं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितलं. मात्र सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षाने सभात्याग केला.

महाराष्ट्र विना अनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था सुधारणा विधेयक काल विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झालं. खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश आणि शुल्क नियमन करणं हे याचं उद्दिष्ट आहे.

**<u>मंत्रिमंडळ निर्णय-मुंबई-कोल्हापूर</u>**

महाराष्ट्रात धर्मांतर विरोधी कायद्याला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी काल वार्ताहरांना दिली. धर्म स्वातंत्र्य अधिनियम 2026 या नावानं हा कायदा असेल, या कायद्याचा शासन आदेश लवकरच निघेल असं राणे म्हणाले. कोल्हापूरमध्ये आयटी पार्क उभारण्यासाठी शेंडा पार्कमधील 34 हेक्टर जमीन देण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली असल्याची माहिती मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

**<u>राज्यसभा उमेदवारी अर्ज</u>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीकरता 10 राज्यांमधल्या 37 जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. महाराष्ट्रातल्या सात जागांसाठी काल ज्येष्ठ नेते शरद पवार, रामदास आठवले, विनोद तावडे, पार्थ पवार यांच्यासह 9 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. महाविकास आघाडीनं शरद पवार यांना पाठिंबा दिला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते अर्ज भरण्यासाठी विधिमंडळात येऊ शकले नाहीत. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी पवार यांच्या निवासस्थानी जाऊन प्रक्रिया पूर्ण केली.

भारतीय जनता पक्षाकडून रामदास आठवले, विनोद तावडे, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला तर शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांनी अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पार्थ पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज सूचक नसल्याने बाद होण्याची शक्यता असल्यानं ही निवडणूक बिनविरोध होईल, असा अंदाज आहे.

**<u>वाहतूकदार संप</u>**

इ-चलन रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचं आश्वासन दिल्यानंतर, काल राज्यातल्या विविध वाहतूकदार संघटनांनी पुकारलेला राज्यव्यापी संप मागं घेण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<u>दुबई नागरिक परत</u>**

पश्चिम आशियातील संघाराशामुळे अखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना परत आणण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत आहेत. दुबईत गेलेल्या पुणे जिल्ह्यातल्या 246 नागरिकांपैकी आतापर्यंत 128 नागरिक सुखरूप पुण्यात परतले असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. अखाती देशांत अडकलेले नांदेडचे 59 नागरिक सुरक्षित असल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रानं दिली. नाशिक जिल्ह्यातील 402 नागरिक आखाती देशांमध्ये अडकलेले होते. त्यामध्ये 320 नागरिक मालेगावातील तर अन्य नाशिक शहर आणि परिसरातील आहेत. यापैकी दिंडोरी आणि नाशिकमधील दहा जण काल नाशिकमध्ये परतले.

**<u>शिवजयंती उत्सव</u>**

तिथीनुसार शिवजयंतीचा उत्सव आज जुन्नर तालुक्यातल्या शिवनेरी गडावर साजरा होत आहे. श्री शिवनेरी स्मारक समिती पुणे आणि जुन्नर शहर शिवजयंती उत्सव समिती यांच्या वतीनं या उत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून, उत्सवात पालखी सोहळा आणि  पारंपरिक पद्धतीनं पाळणा म्हणून सकाळी 9 वाजता शिवजन्मोत्सव साजरा होईल.

**राजाराम महाराज जयंती**

स्वराज्याचे तिसरे छत्रपती, छत्रपती राजाराम महाराज यांची तिथीनुसार जयंती काल प्रथमच सिंहगडावर उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त अभिषेक, पूजन, आणि व्याख्यानांच्या माध्यमातून स्वराज्यभावनेचा जागर करण्यात आला.

**बीज सोहळा**

संत तुकाराम महाराज यांचा 378 वा बीज सोहळा काल श्रीक्षेत्र देहू नगरीत हजारो भाविक आणि वारकरी यांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात पार पडला. पहाटे तीन वाजता काकड आरती साठी मंदिराचा दरवाजा उघडण्यात आला. त्यानंतर मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. टाळ मृदुंगाचा गजर आणि अभंगांनी देहूचं वातावरण भक्तिमय झालं होतं.

**आरती प्रभू पुरस्कार**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बाबा वर्दम थिएटर्स कुडाळ आणि आरती प्रभू कला अकादमी यांच्या वतीनं दिला जाणारा यंदाचा आरती प्रभू पुरस्कार सुप्रसिद्ध कवी, गीतकार प्रवीण दवणे यांना जाहीर झाला आहे. चिं. त्र्यं. खानोलकर तथा आरती प्रभू यांच्या जन्मदिनी म्हणजेच येत्या 8 मार्चला कुडाळ इथं पुरस्कार प्रदान केला जांणार आहे.

**क्रिकेट**

टी ट्वेन्टी विश्वचषक स्पर्धेत भारताने सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मुंबईतल्या वानखेडे मैदानावर काल झालेल्या रोमहर्षक उपांत्य सामन्यात भारताने इंग्लंडचा 7 धावांनी पराभव केला. वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत भारताने सलग दुसऱ्यांदा उपांत्य सामन्यात इंग्लंडचा पराभव केला. अत्यंत उत्कंठावर्धक झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने 253 धावा केल्या. संजू सॅमसनच्या 42 चेंडूत 89, शिवम दुबेच्या 25 चेंडूत 43 धावा आणि ईशान किशनच्या 18 चेंडूत 39 धावांच्या जोरावर भारताने धावांचा हा डोंगर उभा केला. या धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडनेही तोडीस तोड फलंदाजी केली. जेकब बेथलच्या 48 चेंडूतील 105 धावांच्या जोरावर इंग्लंडने 246 धावा फटकावल्या. वानखेडे मैदानावर काल चौकार आणि षटकारांची अक्षरशः बरसात पाहायला मिळाली. वीस षटकांच्या सामन्यात दोन संघांनी मिळून काल सर्वोच्च 499 धावा केल्या. संजू सॅमसनला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. आता 8 मार्च रोजी अहमदाबाद इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम सामना होणार आहे.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंत राज्यात  हवामान कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.